| MHRT020008522016 | दावा दाखल दिनांक | : | २२/११/२०१६ | | |
|---|---|---|---|---|---|
| | दावा नोंदणी दिनांक | : | २२/११/२०१६ | | |
| | दावा निकाल दिनांक | : | १४/०७/२०२६ | | |
| | निकाल कालावधी | : | व. | म. | दि. |
| | | | ०९ | ०७ | २२ |

**४ थे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रत्नागिरी. जि. रत्नागिरी यांचे न्यायालयात.**

**(पिठासीन अधिकारी श्रीमती के.एस.पाटील)**

**नियमित दिवाणी दावा क्र.२६२/२०१६**

**निशाणी क्रमांक : ५५**

| | | |
|---|---|---|
| | सौ. सेजल सुर्यकांत धानबा,<br>उ.व.सु. ३३ वर्षे, व्यवसाय – गृहिणी व खाजगी नोकरी<br>रा. देसाई चाळ, जुना माळनाका, ता.जि. रत्नागिरी | ........वादी |
| | विरुद्ध | |
| १) | कमलाकर नारायण लाकडे,<br>उ.व.सु. ३३ वर्षे, व्यवसाय– मच्छीमारी, | .....प्रतिवादी |
| २) | रामचंद्र दगडू हरचकर<br>उ.व.सु. ३१ वर्षे, व्यवसाय – मच्छीमारी,<br>रा. पूर्णगड, खारवीवाडा, ता.जि. रत्नागिरी | |

**दावा रक्कम रुपये १,३५,१००/– वसुलीसाठी.**

**वादीतर्फे विधिज्ञ – श्री. जी.जी.देसाई.**

**प्रतिवादी क्र.१ विधिज्ञ – सचिन सुधीर थरवळ.**

**प्रतिवादी क्र.२ – एकतर्फा.**

## न्या य नि र्ण य
## (अधिघोषित दिनांक १४/०७/२०२६)

वादीने प्रस्तुतचा दावा रक्कम रुपये १,३५,१००/– चे वसुलीकरिता दाखल केलेला आहे.

२. वादीने दाव्यात नमुद केलेली हकीगत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

वादी व प्रतिवादी नं. २ यांच्या मालकीची, मच्छिमारी नौका हेमावती MH/E/VNG/05/1015 अशी होती. काही कारणांमुळे त्याना मच्छिमारीचा व्यवसाय पुढे चालू ठेवणे अशक्य झाले व त्यामुळे त्यांनी म्हणजे वादी व प्रतिवादी नं. २ यांनी सदरची नौका प्रतिवादी नं. १ ला कायमपणे विकून टाकण्याचे ठरविले.

३. वादी–प्रतिवादींमध्ये सदरच्या मच्छिमारी नौकेसंदर्भात करार झाला व त्यावेळीच सदरच्या वर नमूद केलेल्या मच्छिमारीत नौकेचा ताबा प्रतिवादी नं.१ ने स्वीकारला, त्यायोगे प्रतिवादी नं.१ मच्छिमारी व्यवसाय करून लाखो रुपये मिळवत आहे.

४. वरील कराराचे दिवशी, ता.१२/१२/२०१३ रोजी प्रतिवादी नं.१ ने वादी व प्रतिवादी नं.२ यांना एकूण रक्कम रु.१,००,०००/– प्रत्येकी रु.५०,०००/– च्या दोन चेकने बँक ऑफ इंडिया, शाखा पूर्णगडवरील चेकने दिले. त्या दिवशी प्रतिवादी नं. १ वादीला रु.१,००,०००/– देणे निघत होता. सदरचे नौकेवर कोणत्याही प्रकारचे कर्ज असेल तर ते सर्व कर्ज व्याजासहित फेडण्याची जबाबदारी प्रतिवादी नं.१ ने स्वीकारली होती.

५. त्याच दिवशी रु.१,००,०००/– प्रतिवादी नं.१ ने, वादीला द्यावयाचे ठरले होते. करार पूर्ण होताच, सर्वाच्या सह्या झाल्यावर उर्वरीत रक्कम रु. १,००,०००/– प्रतिवादी नं.१ ने वादीला चेकने देण्याचे कबूल केले होते. त्यामुळे दि. १२/१२/२०१३ च्या करारात रु.१,००,०००/– बँक ऑफ इंडिया, शाखा पूर्णगड वरील चेकने दिले असे

नमूद केले होते. मात्र प्रत्यक्षात तसा कोणताही चेक प्रतिवादी नं. १ ने वादीला त्यानंतर वा आज तारीखअखेर दिला नाही व वादीची प्रतिवादी नं.१ ने जाणीवपूर्वक आर्थिक फसवणूक केली. उभयतांमधील व्यावसायिक संबंध लक्षात घेऊन वादीने प्रतिवादी नं.१ विरुद्ध फौजदारी खटला व दिवाणी खटला सुरू करण्याचे टाळले होते.

६. प्रतिवादी नं.२ विरुद्ध वादींची कोणतीच तक्रार नाही. वादी व प्रतिवादी नं. २ ही सख्खी भावंडे आहेत. परंतु ता.१२/१२/२०१३ च्या करारात प्रतिवादी नं.२ पक्षकार असल्याने दाव्यात तांत्रिक उणीव राहू नये म्हणूनच केवळ त्यांना पक्षकार केले आहे.

७. प्रतिवादी नं.१ विरुद्ध कोणतीच दाद वादी या दाव्यात मागत नाही. प्रतिवादी नं. २ च्या हिश्श्याची सर्व रक्कम प्रतिवादी नं.१ ने त्यांना पूर्वीच दिली आहे.

८. ता.१२/१२/२०१३ रोजी, प्रतिवादी नं.१ ने वादीला रु. १,००,०००/- दिले असते, तर ती रक्कम पतसंस्थेत गुंतवून वादीला आजपर्यंत दरसाल दर शेकडा १२% प्रमाणे व्याज मिळाले असते. प्रतिवादी नं.१ ने वादीची फसवणूक केल्याने वादीचे फार मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

९. वादी व प्रतिवादी नं.२ यांनी वादीला ता.३१/०७/२०१४ रोजी रजिस्टर्ड नोटीस पाठवून रु.१,००,०००/- या रकमेची मागणी केली तसेच त्यापूर्वी ४-६ महिन्यांत सुमारे ८-१० वेळा समक्ष भेटून, रकमेचा तगादा प्रतिवादी नं.१ कडे लावला. मात्र प्रत्येकवेळी काहीतरी खोटी कारणे देऊन रक्कम देण्याची त्याने टाळाटाळ केली, त्यानंतर पुन्हा वादीने प्रतिवादी नं.१ ला ऑक्टोबर २०१६ मध्ये नोटीस पाठविली व रकमेची मागणी केली. दोन्ही वेळा नोटीस प्रतिवादी नं.१ ला रजिस्टर्ड पोस्टाने पाठवून त्या नोटीसीची एक प्रत, साध्या पोस्टाने सुद्धा पाठविली होती, त्यापैकी कोणतीही नोटीस वादीकडे परत आलेली नाही व दोन्ही नोटीसा प्रतिवादी नं.१ ला मिळाल्या आहेत.

१०. वादी महिला असल्याने, ती आपल्या विरुद्ध कोणतीच कायदेशीर कारवाई करणार नाही असे प्रतिवादी नं.१ उघडपणे गावात वारंवार बोलून दाखवत आहे. तसेच

वादीच्या असहाय्यतेचा व ती महिला असल्याचा गैरफायदा घेऊ पहात आहे.

**११.** प्रतिवादी नं.१ चे वर्तन, आचरण व कृती पाहता तो वादीचा दावा मुदतीत दाखल होऊ नये यासाठीच तो जाणीवपूर्वक रकम देणेची टाळाटाळ करीत असून, रक्कम देण्याची खोटी आश्वासने प्रतिवादी नं.१ वादीला सतत देत राहिला आहे. त्यामुळे सदरच्या रक्कमेच्या रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख मात्र) वसूलीसाठी वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

**१२.** प्रतिवादी क्र.१ यांनी नि. २१ अन्वये कैफियत दिली असून वादी यांनी दाखल केलेला दावा हा खोटा, खोडसाळ असुन दाव्याचे कामी या प्रतिवादी विरुध्द करण्यात आलेली विधाने खोटी व खोडसाळ आहेत. दाव्यात नमुद केलेल्या बोटीशी या प्रतिवादीचा काहीही संबंध नाही. अगर त्या बोटीच्या अनुषंगाने वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान कधीही व कोणताही करार झालेला नाही. दाव्याचा विषय असलेली बोट अगर नौका या प्रतिवादीच्या ताब्यामध्ये कधीही नव्हती. दाव्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे वादीने अथवा प्रतिवादी क्र.२ याने या प्रतिवादीस कोणतीही व कसलीही रक्कम अदा केलेली नाही. सबब, प्रतिवादी क्र.१ वादीचे कायदेशीर देणे लागत नाही.

**१३.** श्री.भिवा आत्माराम आडकर यांचेकडून प्रतिवादी क्र.१, नागेश लाकडे यांचा रक्कम रुपये ७,५०,०००/- इतक्या रक्कमेबाबत व्यवहार ठरला. त्या व्यवहारा प्रमाणे या प्रतिवादीने श्री.भिवा आत्माराम अडकर यास रक्क्म रुपये १,००,०००/- अदा केले. तर वादीस त्याने त्या प्रतिवादीचे म्हणून दिलेली रक्क्म रुपये १,००,०००/- ही रक्कम वादी हिला रोखीने दिली व तद्-नंतर नौकेची उर्वरीत रक्कम करणेकरीता दि.०१/१२/२०१३ रोजी श्री.अनिल लाकडे यास रक्कम रुपये १,००,०००/- अदा केले. त्यापूर्वी त्याच बोटी संदर्भात नागेश विठ्ठल लाकडे व भिवा आत्माराम अडकर यांचा एक करार झाला होता. थोडक्यात दावा विषयक मिळकतीमधील नौकेशी वादी अथवा प्रतिवादी क्र.२ यांचा काहीही संबंध नाही.

**१४.** श्री.अडकर यांचेकडून नौका खरेदी करतेवेळभ् या प्रतिवादीने रक्कम रुपये ३,००,०००/– वेळोवेळी अदा केलेले असून बोटीवरील खर्च देखील केला आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी प्रस्तुतची बोट खरेदी करतेवेळभ् अनिल लाकडे व बाबासाहेब अशा असामींकडून रक्कमा उचलल्या होत्या. बोट ताब्यात घेतल्यानंतर त्या रक्कमा परतफेड होण्याकरीता मिळणारा सर्व माल त्यांना घालावा लागत होता व तो संपूर्ण व्यवहार प्रतिवादी क्र.२ हाच पाहात होता. प्रस्तुत नौका ताब्यात घेतल्यानंतर जैतापूर बंदरामध्येच बोटीचा अपघात झाला. त्या अपघातानंतर रक्कम रुपये २,००,०००/– एवढा तिच्या दुरुस्तीचा खर्च या प्रतिवादीलाच करावा लागला. वादी म्हणते त्याप्रमाणे बोटीचा ताबा या प्रतिवादीकडे नाही. हा प्रतिवादी अशिक्षीत व अडाणी असल्याने त्याच्या अशिक्षीतपणाचा गैरफायदा उचलुन पैसे उकळण्याचा हेतु म्हणुन प्रस्तुत दावा दाखल केला आहे. तरी तो खर्चासह फेटाळण्याची विनंती प्रतिवादी क्र.१ यांनी केली आहे.

**१५.** प्रतिवादी क्र.२ यांना नि.६ प्रमाणे दावा समन्सची बजावणी होऊन देखील ते दाव्यात हजर न झालेने त्यांचे विरुध्द नि.१ वर दि.३०/०६/२०१७ रोजी एकतर्फा आदेश पारीत करणेत आला आहे.

**१६.** वादीतर्फे सुविद्य विधिज्ञ श्री.जी.जी.देसाई यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे युक्तीवाद नाही.

**१७.** दाव्यातील वादकथने व युक्तीवाद लक्षात घेता दाव्याच्या निकालाकरीता खालील मुद्दे (Points) माझे विचारार्थ निर्माण झाले असून सदरचे मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत पुढीलप्रमाणे दिले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादी हे सिध्द करते का की, मासेमारी बोटीशी संबंधित व्यवहारासाठी प्रतिवादी क्र.१ रु.१,००,०००/– रक्कम देण्यास जबाबदार आहे ? | **... होकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| २) | वादीला व्याजासह रु.१,००,०००/– रक्कम वसुल करण्याचा अधिकार आहे का ? | **... होकारार्थी.** |
| ३) | आदेश काय व हुकूमनामा काय ? | **...दावा मंजुर करण्यात येतो.** |

## कारणमिमांसा

**१८.** वादीने त्याची भिस्त खाली नमुद तोंडी व कागदोपत्री पुराव्यांवर ठेवलेली आहे. वादीतर्फे नि.क्र.५२ येथे लेखी युक्तीवादातील महत्वाचे मुद्दे दाखल करणेत आले आहेत. प्रतिवादी क्र.१ तर्फे नि.क्र.५३ येथे लेखी युक्तीवादातील महत्वाचे मुद्दे दाखल करणेत आले आहेत. तसेच वादीतर्फे नि.५४ येथे प्रतिवादीचे युक्तीवादावर लेखी रिप्लाय दाखल करणेत आला आहे.

**कागदोपत्री पुरावा**

| अनु.क्र. | कागदपत्राचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|
| १. | वादीने प्रतिवादी क्र.१ ला पाठविलेली ता.३१/०७/२०१४ ची नोटीस | ३३ |
| २. | मच्छीमारी नौका MH/E/VNG/05/1015 हेमावतीचे संदर्भातील प्र.वादी व वादी यांचेतर्फे झालेला ता.१२/१२/२०१३ चा करार | ३४ |
| ३. | वादीने प्र.वादी १ पाठविलेली नोटीस प्र.वादी बाहेर गावी गेल्याने ती परत आली. लखोटा व ए.डी.सह | ३५ |

**तोंडी पुरावा**

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | सेजल सुर्यकांत धानबा | वादी | १४क/२४ |

<u>**प्रतिवादीतर्फे कागदोपत्री पुरावा–**</u>

| | | |
|---|---|---|
| | निरंक | |

<u>**प्रतिवादीतर्फे तोंडी पुरावा –**</u>

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | कमलाकर नारायण लाकडे | प्रतिवादी | ४१ |

<u>**मुद्दा क्रमांक १ व २ः–**</u>

**१९.** सदरचे मुद्दे हे वादी व प्रतिवादी क्र.२ यांच्या मालकीची मच्छीमारी नौकाचे खरेदी व्यवहारामध्ये प्रतिवादी क्र.१ हा वादीचे रक्कम रुपये १,००,०००/- देणे लागतात का ? याबाबत आहे. सदरचे दोन्ही मुद्दे एकमेकांशी संलग्न आहेत. त्यामुळे त्यांचे विवेचन एकत्रित केले आहे.

**२०.** वादी सेजल सुर्यकांत धानबा यांनी नि.क्र.१४क व नि.क्र.२४ येथे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. तसेच वादीने नि.क्र.३८ येथे अधिक तोंडी पुरावा द्यावयाचा नाही अशी पुरसिस दाखल केली आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी नि.क्र.४१ येथे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ ने नि.क्र.४८ येथे अधिक तोंडी पुरावा द्यावयाचा नाही अशी पुरसिस दाखल केली आहे.

**२१.** वादीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की दावा मिळकती संदर्भात जे दोन मुद्दे काढण्यात आलेले आहेत ते दोन्ही मुद्दे शाबित करण्यात वादी यशस्वी झाला असून वादीने त्याचा दावा हा तोंडी व कागदपत्रे पुराव्याने शाबित केलेला आहे. तसेच वादीने प्रतिवादीला पोस्टाने व साध्या पोस्टाने देखील नोटीस पाठवले होती प्रतिवादी मात्र साध्या पोस्टाने पाठवलेली नोटीस मिळाली नाही असे कथन करीत नसल्यामुळे वादीने नोटीस मिळाली असल्याचे शाबित केले आहे असे कथन केले त्यामुळे वादीचा दावा मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

२२. प्रतिवादी तर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ज्या मच्छीमारी नौकेच्य विक्रीच्या मोबदल्याची वादी मागणी करत आहेत त्याची मालकी व कब्जा वादीने तोंडी कागदपत्रे पुराव्याने सिद्ध केलेले नाही. तसेच नौका खरेदी केलेल्याचा पुरावा देखील हजर केलेला नाही. तसेच सदरचा कायदा हा मुदतीच्या कायद्यातील तरतुदीप्रमाणे दि.१२/१२/२०१६ रोजी दाखल करणे गरजेचे होते परंतु तसे न करता सदरचा दावा हा मुदतीनंतर दाखल केला असल्याने वादीचा दावा मुदत बाह्य असल्याने फेटाळण्यात यावा असे युक्तिवाद करण्यात आला. तसेच नोटिसीची बजावणी प्रतिवादी वर झाली ही बाब देखील साबित झाले नसल्याने वादीचा दावा नामंजूर करण्याची विनंती केली.

२३. वादी व प्रतिवादी कथन करित आहेत त्याप्रमाणे वादमुद्दे निश्चित केलेले आहेत. त्याअनुषंगाने त्याचा विचार होणे आवश्यक आहे.

२४. वादीनी सदरचा दावा हा प्रतिवादी क्र.१ कडून रक्कम रुपये १,००,०००/- (एक लाख रुपये) नौका विक्रीपोटी देय असलेली रक्कम व्याजासहित वसून होऊन मिळणे करिता केलेला आहे. यासाठी वादी कथन करीत आहे त्याप्रमाणे वादी यांनी नौका विक्री केलेनंतर प्रतिवादी क्र.१ यांनी नौकेचा ताबा स्वीकारला व त्यायोगे मच्छीमारी व्यवसाय करीत होते की कसे हे पाहणं आवश्यक आहे तरी प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये ही बाब मान्य केलेली नाही.

२५. प्रतिवादी क्रमांक १ हा वादीचे रक्कम रुपये एक लाख रुपये देणे लागत आहे किंवा कसे हे पाहणे आवश्यक आहे यासाठी वादीने पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी २४ लगत दाखल केले असून दाव्यातील घटनांची पुनरावृत्ती प्रतिज्ञा पत्रामध्ये केली आहे. वादीच्या कथनानुसार वादी व प्रतिवादी क्रमांक २ यांच्या मालकीची असणारी मच्छीमारी नौका उमावंती एम.एच./व्ही.इ.एन.जी.०५/१०१५ ही मच्छीमार व्यवसायासाठी प्रतिवादी क्रमांक २ यांना कायमपणे विकण्याची ठरवलेले होते. त्यानुसार त्यांच्यामध्ये मच्छीमारी नौकेच्या संदर्भात करार झाला होता व कराराच्या वेळेस नौकेचा ताबा प्रतिवादी क्रमांक ०१

ने स्वीकारला व करारा दिवशीच म्हणजेच दिनांक १२/१२/२०१३ रोजी प्रतिवादी क्रमांक १ ने प्रतिवादी नंबर २ यांना एकूण एक लाख प्रत्येकी ५० हजार रुपये चे दोन चेक बँक ऑफ इंडिया शाखा पूर्णगड वरील चेकने दिले व त्या दिवशी प्रतिवादी ०१ नंबरला वादी रक्कम रुपये एक लाख रुपये देणे लागत होता. करारावर सर्वांच्या सह्या झाल्यानंतर उर्वरित रक्कम एक लाख रुपये प्रतिवादीने वादीला चेकने देण्याचे कबूल केले होते व करारांमध्ये प्रतिवादी क्रमांक १ ने वादीला एक लाख रुपये चेकने दिले असे नमूद केले होते परंतु प्रत्यक्षात तसे कोणताही चेक प्रतिवादी १ ने आज अखेर पर्यंत वाढीला दिला नाही. म्हणून वादीने सदरचा दावा दाखल केला आहे.

२६. वादीची कथने खोडून काढण्यासाठी प्रतिवादीने निशाणी ४१ येथे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यांच्या कथनानुसार दावा मिळकतीमध्ये असणाऱ्या बोटीचा या प्रतिवादीचा काहीही संबंध नसून वादी व प्रतिवादी याच्यामध्ये कधीही व कोणताही करार झालेला नाही असे कथन केले. व वादीचे प्रतिवादी कोणतेही देणे लागत नसून भिवा आत्माराम आडकर यांचे कडून प्रतिवादी क्रमांक १ नागेश लाकडे यांच्या दरम्यान साडेसात लाख रुपये इतक्या रकमेचा व्यवहार ठरला होता व त्याप्रमाणे एक लाख रुपये रोखीने दिल्या असून अनिल लाकडे यास रक्कम रुपये एक लाख अदा केलेले आहेत व बोटी संदर्भात नागेश लाकडे व भिवा आत्माराम अडकर यांच्यामध्ये करार झाला असून बोटीचा वादी अथवा प्रतिवादी क्रमांक २ यांचा काहीही संबंध नसल्याचे कथन केले.

२७. प्रतिवादीने वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान कोणतेही करार पत्र झाले नाही असे कथन केले असले तरी प्रतिवादीने वादीला उलटतपासात करार पत्रावरून प्रश्न विचारण्यात आलेले आहेत व त्यातील वादी व प्रतिवादी यांची सही देखील त्याने मान्य व कबूल केलेली आहे व नि.३४ वरील करारपत्रामध्ये स्टॅम्प घेणार म्हणुन प्रतिवादीचे नाव असल्याचे मान्य केलेले आहे. त्यामुळे प्रतिवादीला सदरचा करारनामा मान्य असल्याचे दिसून येते. त्यामुळे कैफियतीमध्ये एक गोष्ट नमुद करुन परस्पर विरोधी कथने उलटतपासामध्ये प्रतिवादीनी केलेली दिसुन येतात. तसेच प्रतिवादीने उलटतपासात बँक

ऑफ इंडिया या बँकेची प्रत्येकी ५० हजारचे दोन चेक वादीला कधीही दिलेले नाहीत हे मान्य केलेले आहेत. यावरूनच वाद विषयक रक्कम वादीला दिलेली नाही हे स्पष्ट होते. दावा मिळकतीमध्ये असणारी हेमलता नौका ही वादीच्या मालकीची असल्याबाबत कोणताही कागदपत्रे पुरावा दाखल केला नाही असा बचाव घेतला असला तरी प्रतिवादीने त्याच्या उलटतपासामध्ये सदरची नौका ही आडकर यांची मालकीची असल्याचे उलटतपासात मान्य केले आहे. त्यामुळे नौकेच्या मालकीचा प्रश्न उपस्थित करणे योग्य होणार नाही.

२८. प्रतिवादीने त्याच्या बचावासाठी नागेश लाकडे व भिवा अडकर यांच्यामध्ये एक करार झाला असून दावा विषय नौकेचा वादी अथवा प्रतिवादी नंबर २ चा काही संबंध नाही असे कथन केले आहे परंतु त्या अनुषंगाने प्रतिवादी नंबर १ ने कोणताही कागदपत्रे पुरावा या केस कमी दिलेला नाही तसेच रक्कम रुपये तीन लाख रुपये आडकर यांना कधी व कसे दिले याबाबतचा मजकूर कैफियत मध्ये व प्रतिज्ञा पत्रामध्ये नमूद नाही व त्या संदर्भात कोणताही कागदपत्रे पुरावा या केस कमी हजर केलेला नाही. या सर्व बाबींचा विचार करता असे दिसून येते की प्रतिवादीकडून येणे बाकी असल्याचे वादींनी शाबित केलेले आहे. म्हणून मुद्दा क्रमांक १ चे उत्तर हे होकारार्थी दिलेले आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीताः–</u>**

२९. वादीने प्रतिवादीकडून र.रु.१,००,०००/– रुपये वसूल होऊन मिळण्यास पात्र आहे असे शाबित केले असल्याने वादीने त्याचा दावा हा शाबित केला आहे. त्यामुळे वादीने दावा दाखल केल्यापासून प्रतिवादीला नाहक दावा प्रलंबित ठेऊन वादीस शारिरिक व मानसिक त्रास दिल्याचे दिसून येते. त्याअनुषंगाने वादी हे प्रतिवादीकडून र.रु. १०,०००/– रुपये नुकसानभरपाई मिळण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दा क्र. २ चे उत्तर मी होकारार्थी देत आहे.

३०. सदर रक्कम व्याजासहित वसूल होऊन मिळावी अशी वादीने दाव्यामध्ये विनंती केली आहे. यामध्ये दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ३४ चा विचार केला असता अशा

परिस्थितीत वादी हा ६% व्याजदर मिळणेस पात्र असल्याचे दिसून येते. वरील विवेचनावरुन वादी हा दावा निकाल तारखेपासून ते सदर रक्कम वसुल होईपर्यंत व्याजदर मिळणेस पात्र असल्याचे निष्कर्षास मी आली आहे. म्हणून मुद्दे क्र.३ चे उत्तर होकारार्थी नोंदवून खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा दावा खर्चासह खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ने वादीस देय असलेली रक्कम रू.१,००,०००/–(एक लाख रुपये मात्र) व नुकसान भरपाई र.रु. १०,०००/– ही आदेश झाल्यापासून २ महिन्यांचे कालावधीत वादीस अदा करावी.

३. वादीस सदर वर नमूद रकमेवर द.सा.द.शे. ६% व्याजदराने दावा निकाल तारखेपासून ते संपूर्ण रक्कम परतफेड होईपर्यंत व्याज आकारण्याचे स्वातंत्र्य राहील.

४. येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करणेत यावा.

**(खुल्या न्यायालयात निर्णय घोषीत करण्यात आला.)**

KALYANI SAVAN PATIL

Digitally signed by KALYANI SAVAN PATIL
Date: 2026.07.14 17:16:48 +0530

**ठिकाण–रत्नागिरी** **(श्रीमती के.एस.पाटील)**

**दिनांक– १४/०७/२०२६** **४ थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रत्नागिरी.**

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करते की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द-नि-शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | नेहा शेखर देसाई (श्रेणी -३) |
| न्यायालयाचे नाव | श्रीमती के.एस.पाटील,<br>४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, रत्नागिरी. |
| न्यायनिर्णय घोषित केलेची तारीख | १४.०७.२०२६ |
| न्यायीक अधिकारी यांनी न्यायनिर्णयावर सही केलेची तारीख | १४.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केलेची तारीख | १४.०७.२०२६ |